# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०८/२०२४ (सोमवार) दुपार**

---

**पोलीस स्टेशन सावनेर येथील पोलीस अधिकारी अंमलदार व भालेराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय सावनेर येथील शालेय विद्यार्थी यांची संयुक्तपणे तिरंगा रॅली**

दिनांक ०९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीमध्ये हर घर तिरंगा म्हणजे घरोघरी तिरंगा अभियान राबविले जात असुन याचे औचित्य साधुन पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत आज दिनांक १२/०८/२०२४ रोजी सकाळी ८/३० वा. ते १० वाजता पर्यंत भालेराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय सावनेर येथील शालेय विद्यार्थी व पोलीस स्टेशन सावनेर येथील पोलीस अधिकारी अंमलदार यांचे संयुक्तपणे तिरंगा रॅली काढण्यात आली होती. सदर रॅलीमध्ये हजार ते बाराशे शालेय विद्यार्थी उपस्थित होते. यामध्ये पोलीस स्टेशन सावनेर येथील पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर, पोस्टे सावनेर येथील अधिकारी व इतर स्टाफ यांनी मोठया संख्येने सहभाग घेतला.







हर घर
तिरंगा


हर घर
तिरंगा




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर